# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दुरध्वनी / फॅक्स : २५६५६२३४, E-Mail : ropune@dtemaharashtra.gov.in ; Website : www.ropune.org.in

**कालमर्यादा -- ------**
**परिपत्रक (ई-मेलद्वारे)**

जा.क्र. : तंशिविकापु/आस्था-३(अ)/सुसेआप्रयो/२०१९/ 2846
दिनांक : 09 JUL 2019

**विषय :- सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांच्या सुधारीत सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अनुज्ञेयतेबाबत गट क व गट ड पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांची माहिती ----**

संदर्भ :- शासन निर्णय, वित्त विभाग निर्णयक क्रमाक वेतन १११९/प्र.क्रं.३/२०१९/सेवा-३,दि.०२/०३/२०१९

उपरोक्त संदर्भान्वये सर्व संस्था प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना कळविण्यात येते की, दि. १.१.१६ ते सातंव्या वेतन अयोगानुसार सुधारीत सेवातंर्गत प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबतचे आदेश निर्गमित होण्याच्या तारखेपर्यत ज्यांना, शासन निर्णय वित्त विभाग दि. १/४/२०१० नुसार सुधारीत सेवातंर्गत आश्वासति प्रगती योजनेचा यथ्यास्थिती पहिला व दुसरा लाभ मंजूर करण्यात आला आहे. अशा कर्मचाऱ्याना असुधारीत लाभाचे, यापुर्वीचे आदेश रदद करून त्यांना तीन लाभाच्या योजेनेनुसार सातव्या वेतन आयोगाच्या मॅट्रीक्सनुसार, पदोन्नतीच्या पदाच्या सातव्या वेतन अयोगाच्या वेतनश्रेणी, सदर लाभ सुधारीतरित्या मंजूर करण्यात येतो. त्याअनुषंगाच्या असुधारीत लाभाची रक्कम सुधारीत लाभाच्या रकमेशी समायोजित करून फरकाची रक्कम संबधीतांना अनुज्ञेय करण्यात यावी असे आदेश संदर्भाधीन शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेले आहे. तसेच या तीन लाभाच्या योजनेच्या लाभार्थीस पदोन्नतीच्या पदाकरीता विहीत केलेली अर्हता, ज्येष्ठता, पात्रता, अर्हता परीक्षा, विभागीय परीक्षा उत्तीर्ण असणे, गोपनीय अहवाल प्रतवारी, विभागीय चौकशी व न्यायिक प्रकरण प्रलंबित नसणे, जातीवैधता प्रमाणपत्र उपलब्ध असणे अशा पदोन्नतीच्या कार्यपध्दतीची विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत पुर्तता करणे आवश्यक आहे.

संदर्भाधीन शासन निर्णयातील उपरोक्त नमुद तरतुदीनुसार या कार्यालयाच्या अधिपत्याखालील वर्ग ३ व वर्ग ४ मधील पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांची (दि. ०१/०१/२०१६ ते दि. ३१/३/२०२० पर्यतच्या कालावधीत ) ज्या कर्मचाऱ्यांनी यथास्थिती पहिला व दुसरा लाभ घेतला आहे.,अथवा घेणार आहेत. त्यांना १०/२०/३० वर्षानंतर अनुज्ञेय ठरणारी तीन लाभाची सुधारीत सेवातंर्गत आश्वासित योजना लागु करण्याकरीता संबधीत कर्मचाऱ्यांची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये दि. **२०/०७/२०१९** पर्यत आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करावी. पीडीएफ फाईल पाठविण्यात येवू नये. तसेच सदरची माहिती **Excell Sheet DV-TTYogesh** या फॉन्टमध्ये **A3** साईज पेपरवर तयार करावी, तसेच ई-मेल द्वारे **est.ropune@gmail.com** या पत्त्यावर सॉफ्टकॉपी सुद्धा पाठवावी. सदर माहीती अचूक असल्याबाबत संस्था प्रमुखांनी प्रत्यक्ष खात्री करून सादर करावी.

सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या पहिल्या लाभासाठी यापूर्वी सादर केलेले प्रस्ताव, गोपनीय अहवाल उपलब्ध न झाल्यामुळे तसेच दि. १३/०२/२०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार गोपनीय अहवालांवर अभिवेदन सादर करण्याची संधी देण्यात आलेल्या कर्मचा-यांचे प्रस्ताव, त्याचप्रमाणे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त नसल्यामुळे प्रस्ताव प्रलंबित राहिले असल्यास, त्याबाबत आवश्यक ती पूर्तता करुन, अशा कर्मचा-यांचे प्रस्ताव पुन्हा सादर करण्यात यावेत.

दिनांक २०/०७/२०१९ नंतर प्राप्त होणारे प्रस्ताव तसेच प्रत्यक्ष बैठकीच्या वेळी सादर केले जाणारे नवीन प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

प्र.सहसंचालक, करिता
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**प्रत : माहिती व पुढील कार्यवाहीसाठी –**

१. संचालक/प्राचार्य,
अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे / शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड / शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द)/ शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय कराड
२. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, पुणे / कराड / कोल्हापूर / सोलापूर / मिरज / अवसरी खुर्द
३. प्राचार्य, शासकीय दुरशिक्षण तंत्रनिकेतन, पुणे
४. प्राचार्य, शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगाव
५. प्राचार्य, महाराष्ट्र राज्य इन्स्टिटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अॅन्ड केटरिंग टेक्नॉलॉजी, पुणे
६. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे
७. या कार्यालयातील प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्तळावर प्रदर्शित करण्यासाठी.
८. ३ (ब) व आस्था-४ माहिती व कार्यवाहीसाठी

**पुर्वीच्या अनुज्ञेय योजनेनुसार १२/२४ वर्षानंतर (दिनांक ०१/०१/२०१६ ते दिनांक ३१/०३/२०१९ पर्यंतच्या कालावधीत) ज्या कर्मचाऱ्यांना यथास्थिती पहिला व दुसरा लाभ घेतला आहे. त्याना १०/२०/३० वर्षांनंतर अनुज्ञेय ठरणारी तीन लाभांची सुधारीत सेवातंर्गत आश्वासित योजना लागू करण्याकरीता तसेच ज्या कर्मचाऱ्यांना दि.०१/०१/२०१६ नंतर दि.३१/०३/२०२० पर्यंतच्या कालावधीत सेवेची १०-२०-३० वर्ष पुर्ण होत आहेत. अशा गट क व ड कर्मचाऱ्यांची माहिती.**

| अक्र | कर्मचाऱ्यांचे नाव ,पदनाम,कार्यरत कार्यालय/संस्थेचे नाव | प्रवर्ग (मागास वर्गीय असल्यास जात वैधता प्रमाणपत्र आहे किंवा कसे प्रत जोडण्यास यावी) | प्रथम नियुक्तीचा दिनांक /पदनाम | १२ वर्षानंतर पहिला लाभ मिळाल्याचा दिनांक व वेतनश्रेणी - ग्रेडवेतन (सहाव्या वेतन आयोगानुसार) **या कार्यालयाच्या आदेशाची प्रत जोडावी** | सातव्या वेतनआयोगानुसार १० वर्षानंतर पहिल्या लाभाचा दिनांक व वेतनस्तर | २४ वर्षानंतर दुसरा लाभ मिळाल्याचा दिनांक व वेतनश्रेणी - ग्रेडवेतन (सहाव्या वेतन आयोगानुसार) **या कार्यालयाच्या आदेशाची प्रत जोडावी** | सातव्या वेतनआयोगानुसार २० वर्षानंतर (१२+८) दुसऱ्या लाभाचा दिनांक (सहाव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी ) आणि सातव्या वेतन आयोगाचा वेतनस्तर | विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक (लागू असेले तेथे) | मराठी/हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण सुट आदेश क्रमांक व दिनांक (लागु असेल तेथे) | संगणक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | चारित्र्य पडताळणी झाली किंवा कसे | विभागीय चौकशी किंवा शिस्तभंग कार्यवाही चालू आहे किंवा कसे? चौकशी पुर्ण झाली असल्यास अथवा काही शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशिल नमुद करावा. | दि. ३१/०३/२०१९ अखेर मत्ता व दायित्वे विवरणपत्र सादर केली आहेत किंवा कसे? असल्यास सादर केल्याचा संस्थेचा जावक क्रमांक व दिनांक | संस्थाप्रमुख /कार्यालय प्रमुख यांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |

कार्यालय/संस्था प्रमुखांची स्वाक्षरी